गुरुवार, दि. १७ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २५३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## भयमुक्त समाजनिर्मितीसाठी मुलांपासूनच प्रयत्न गरजेचे

### आयुष नोपानी; नैतिकता आणि संस्कार या विषयावर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा

**जालना । प्रतिनिधी -** आजचा विद्यार्थी हा उद्याचा सुजाण नागरिक असल्यामुळे भयमुक्त आणि कायद्याचे पालन करणारा समाज घडवण्यासाठी मुलांपासूनच प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक मुलावर नैतिकतेचे संस्कार झाल्यास भविष्यात गुन्हेगारीचे प्रमाण कमी होऊ शकते, असे मत अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी व्यक्त केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित नैतिकता आणि संस्कार या विषयावरील विशेष कार्यशाळेत बोलत होते.

ईन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझन आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. १६ एप्रिल रोजी सेंट मेरीज हायस्कूल, जालना येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेंटमेरी हायस्कूलचे प्राचार्य फादर रेव्ह. पथरास तिरकी होते. व्यासपीठावर स्थानिक गुन्हे शाखेचे संजय सोनवणे, महिला पोलीस कर्मचारी चित्रा चव्हाण, ईन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनच्या अध्यक्षा ॲड. अश्विनी धन्नावत, विधी सेवा प्राधिकरणचे ॲड. महेश धन्नावत, पूनम खंडेलवाल, पुनम अग्रवाल, पायल अग्रवाल, अंकिता अग्रवाल यांची उपस्थिती होती.



श्री. नोपानी पुढे म्हणाले की, स्वतः कायद्याचे पालन करणे आणि समाजात कायद्याचा सन्मान राखणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. मुलांनी आपल्या वागणुकीतून समाजात शांतता, सहिष्णुता आणि कायद्याचे पालन याचे महत्त्व पटवून द्यायला हवे. नैतिकता आणि व्यवहार या दोन वेगळ्या बाबी असून, नैतिकतेच्या आधारेच कोणताही व्यवहार योग्य की अयोग्य हे ठरते. मैत्रीच्या नात्यामुळे चुकीच्या गोष्टींना पाठींबा देणे हे भविष्यात गुन्हेगारीकडे नेऊ शकते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या मनात पोलिसांविषयी मैत्रीपूर्ण भावना निर्माण करून कायदा व संविधानप्रिय समाजनिर्मिती करण्याचा उद्देश ठेवण्यात आला होता. या वेळी 'सुरक्षा मंत्र' या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या पुस्तिकेचे मोफत वितरण करण्यात आले.

ईन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनच्या अध्यक्षा ॲड. अश्विनी धन्नावत यांनी यावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, समाजाच्या सकारात्मक परिवर्तनाची सुरुवात ही शाळेतूनच होते. आपली मूलभूत मूल्ये जशी शाळेपासूनच रुजतात, तशीच जबाबदारीची भावना, कायद्याचे महत्त्व, सहिष्णुता, आणि इतर सामाजिक मूल्येही विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे गरजेचे आहे. आपले विद्यार्थी आत्मनिर्भर, सजग आणि जबाबदार नागरिक व्हावेत, हीच आमच्या क्लबची अपेक्षा आहे. अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये पोलीस दलाविषयी आदर पान २ वर

## अल्पवयीन मुलीस फुस लावून पळवून नेणारा जेरबंद

### जालन्याच्या अँटी ह्यूमन ट्रॅफिकिंग युनिटची कामगिरी



**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातून अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेणाऱ्या एकास पोलिसांनी जेरबंद केले आहे. जालन्याच्या अँटी ह्यूमन ट्रॅफिकिंग युनिटने ही कामगिरी केली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक ०८/०५/२०२४ रोजी यातील शेवगा ता. अंबड जि. जालना येथे राहणारा फिर्यादी यांची १७ वर्ष वयाची अल्पवयीन मुलगी हिला दिनांक- ०६/०५/२०२४ रोजी दुपारी ०६.०० च्या सुमारास आरोपी राहुल बरडे वय-२२ वर्ष याने फुस लावुन पळवुन नेले असल्याची फिर्यादीवरून पोलीस ठाणे घनसावंगी येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेला बराच कालावधी होवुन सुद्धा गुन्हयातील आरोपी व पिडीत मुलगी मिळुन न आल्याने सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस अधिक्षक यांच्या आदेशाने दि. ०५/०२/२०२५ रोजी अँटी ह्यूमन ट्रॅफिकिंग युनिट कक्ष जालना यांच्याकडे वर्ग करण्यात आला.

अँटी ह्यूमन ट्रॅफिकिंग युनिट कक्ष पान २ वर

युवा आदर्श

### लाळघोटेपणा ...

स्थायी भाव काहींचा
अति लाळघोटेपणा
असे वाटते त्यांच्याही
पाठीला नाही कणा
रोमा रोमात भरलेला
उसळतो कृतघ्नपणा
उपकाराची जाण ना
विसरून जाती ऋणा
विरोध करताना उगा
हरवला बाणेदारपणा
गुलामगिरीत बांधला
ओळखले ना आपणा
विसंबून दुसऱ्यांवरती
अंगात बांडगुळी खुणा
बुडाले धुक्यात संपूर्ण
विसरले अंगीभूतगुणा
भयग्रस्त ते सदा त्रस्त
पहात नाहीत दर्पणा
सवयलागे कुबड्यांची
रे अपंगत्वाच्या खुणा
निर्णय नाही स्वताचा
पाहतात पाऊल खुणा
प्यादे म्हणून वापरांत
मारले जाती रणांगणा
विचार शक्ती खुंटलेली
स्वावलंबत्वा का उणा
सांभाळती उपाशीपणा
खाती फेकलेला दाणा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार प्रचारासाठी जलरथाचे उदघाटन



**घनसावंगी । प्रतिनिधी -** भारतीय जैन संघटना आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणाऱ्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या महत्वाकांक्षी योजनेच्या प्रचारासाठी जलरथाचे उद्घाटन आमदार हिकमत दादा उढाण यांच्या हस्ते आज घनसांवगी येथे करण्यात आले.याप्रसंगी भारतीय जैन संघटनेचे नरेंद्र जोगड, घनसावंगीचे नगरसेवक मुजायतअली खान, बापूराव कथले पिंपरखेडचे सरपंच अनिल सानप, राजू वाडेकर, कुंडलिक हेमके, संभाजी भालशंकर, राजू घोगरे आदीची उपस्थिती होती या योजनेअंतर्गत पान २ वर

## जेईएस महाविद्यालयात मुलींच्या वस्तीगृहात सॅनिटरीपॅड वेंडिंग मशीनचे उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** जेईएस महाविद्यालय जालना येथे मुलींच्या वस्तीगृहमध्ये इनव्हीलर क्लब ऑफ जालना सेंट्रल तर्फे मुलींसाठी सॅनिटरी पॅड करिता वेंडिंग मशीन लावण्यात आले असून त्याचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इनव्हीलर क्लब ऑफ जालना सेंट्रलचे अध्यक्ष प्रा .शिल्पा कावोना, सचिव श्रीमती अग्रवाल, उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षक डॉ. सुमन बिक्कड , पर्यवेक्षिका प्रा. करूणा वासनिक, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे, वस्तीगृहप्रमुख श्रीमती तळेकर, ग्रंथपाल डॉ.मनीषा सुतार प्रा.उषा चौधरी, प्रा. धनश्री देशपांडे, प्रा. मोनिका काळे, सेविका मिराबाई व वंदना लखापती तसेच वस्तीगृहातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




# 'त्या' उपविभागीय अधिकाऱ्यांसह तहसिलदारांवर निलंबनाची कारवाई करा

### माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांची मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांच्याकडे मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** २०२२-२३ यावर्षी झालेली अतिवृष्टी, पूर व गारपिटीमुळे जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांचे नुकसान प्रचंड नुकसान झाले असून शेतकऱ्यांना शासनाकडून सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले होते हे अनुदान शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित असतानाच उपविभागीय अधिकारी अंबड व भोकरदन तसेच तहसीलदार अंबड, घनसावंगी भोकरदन आणि जाफराबाद यांच्या संदर्भात आणि संबंधित तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक यांनी खऱ्या लाभार्थ्यांना लाभ न देता बोगस शेतकरी दाखवून त्या शेतकऱ्यांच्या नावे अनुदानाची कोट्यावधी रुपयांची रक्कम हडप केल्याचे प्राथमिक माहिती समोर आलेली आहे त्यानुसार संबंधित दोन्ही उपविभागीय अधिकारी आणि चारही तहसीलदार यांना तात्काळ निलंबित करून फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज केली.

अतिवृष्टी पूर व गारपीट यामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मोठ्या अशा अपेक्षा होत्या त्यानुसार संबंधित शेतकऱ्यांना शासनाकडून सानुग्रह अनुदान मंजूर देखील करण्यात आले परंतु त्या अनुदानापैकी ५० कोटी रुपये काही तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायकांनी हडप केल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. खरे पाहता प्रत्येक गावात गारपीट पूर किंवा अतिवृष्टीच्या झालेल्या नुकसानाची पाहणी करताना तलाठी ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांनी संयुक्त पाहणी करून त्याचा अहवाल सादर करणे अपेक्षित आहे या अहवालावर संबंधित तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांचे नियंत्रण असते परंतु प्रत्येक गावात लवकर नुकसान भरपाई मिळण्यासाठी नुकसानाची पाहणी करताना तिघांनी संयुक्त पाहणी न करता केवळ तलाठी किंवा ग्रामसेवक किंवा कृषी सहाय्यक यांनी एकट्याने नुकसानीची पाहणी केली व इतर दोघांनी त्यावर केवळ स्वाक्षरी केली असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

घनसावंगी, अंबड, जाफराबाद व भोकरदन या तालुक्यांत १२,000 बोगस शेतकरी दाखवून त्यांच्या नावावर पैसे वळते केले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्यासाठी तहसीलदारांच्या लॉगिन व पासवर्ड वापरण्यात आला आहे ही बाब अत्यंत गंभीर असून यावर तहसीलदारांचे नियंत्रण असणे अपेक्षित आहे परंतु तसे नियंत्रण असल्याचे दिसून येत नाही. तहसीलदार यांचा लॉगिन व पासवर्ड वापरल्यानंतर देखील तहसीलदार लक्ष देत नसतील तर ही बाब अक्षम्य स्वरूपाची असून यामध्ये दोन्ही उपविभागीय अधिकाऱ्यांसह चारही तहसीलदार सहभागी आहेत काय याची देखील चौकशी होणे आवश्यक असल्याचे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

अपहारासाठी जालना जिल्ह्यात बीड, अहिल्यानगर, बुलाडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची नावे अनुदान यादीत घुसवण्यात आली असून यामध्ये झालेला भ्रष्टाचार व त्याचे पुरावे मिटवण्यासाठी संबंधित दोन्ही उपविभागीय अधिकारी व चारही तहसीलदार प्रयत्न करू शकतात त्यामुळे यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. या प्रकरणातील विशेष बाब म्हणजे एकाच शेतकऱ्याच्या नावे खात्यात अनेकदा पैसे टाकण्यात आले. त्यासाठी भोकरदन जाफराबाद अंबड व घनसावंगी तहसीलदारांचे लॉगिन व पासवर्ड वापरून काही तलाठ्यांनी शेतकऱ्यांसह आपल्या मर्जीने बोगस नावे अपलोड करण्यात आली ही बाब संबंधित तहसीलदारांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरत असताना त्यांच्या निदर्शनास कशी आली नाही? किंवा त्यांनी हेतू पुरस्सर व जाणीवपूर्वक हा भ्रष्टाचार घडवून आणला असल्याची शक्यता नाकारता येत नाही असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.



अंबड व अहिल्यानगरमध्ये कार्यरत तलाठी दांपत्याने नातेवाइकांची यादी बँक खाते क्रमांकासह ऑनलाइन पोर्टलवर अपलोड केली आहे असे देखील प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे. डीबीटीद्वारे पैसे जमा झाल्यावर त्यांना पैसे मागितल्याने हा प्रकार उघडकीस आला व त्यामुळे या सर्व भ्रष्टाचाराचा भांडाफोड झाला आहे उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची जबाबदारी असताना त्यांनी कुठलीही यादी ची फेर तपासणी केलेली नाही त्यामुळे बोगस लाभार्थी या यादीमध्ये समाविष्ट झाले यादी अपलोड करण्यापूर्वी फेर तपासणी करण्याची जबाबदारी तहसीलदार व उपविभागीय अधिकारी याची आहे या अपलोड केलेल्या याद्यांची फेरतपासणी न झाल्यामुळे थेट डीबीटीद्वारे संबंधितांच्या बँक खात्यात पैसेही जमा झाले. ज्याप्रमाणे तलाठ्यांनी अपलोड केलेल्या याद्यांची खातरजमा मंडळ अधिकारी व तहसीलदारांनी करणे अपेक्षित होते, ती करण्यात पान २ वर

# संपादकीय

## मान्सूनचा सुखद सांगावा

मागील काही वर्षात दुष्काळाने पिचलेल्या महाराष्ट्राला भारतीय हवामान खात्याने सुखद धक्का दिला आहे. भारतीय हवामान खात्याने यावर्षी पडणाऱ्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. हा अंदाज बळीराजासाठी सुखावणारा आहे. कारण यावर्षी सरासरीपेक्षा अधिक ( १०५ ) टक्के इतका पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. या अंदाजात पाच टक्के कमी अधिक तफावतीची शक्यता गृहीत धरण्यात आली आहे याचाच अर्थ यावर्षी १०० ते ११० टक्के पावसाची शक्यता आहे. देशाच्या उत्तर आणि ईशान्य भागात तसेच महाराष्ट्रासह दक्षिण भागातही सरासरी इतका किंवा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रावर वरुण राजाची कृपा राहणार असून कायम दुष्काळग्रस्त असणाऱ्या मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातही पावसाचे प्रमाण अधिक असण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हवामान खात्याच्या या अंदाजाने राज्यातील बळीराजा सुखावला आहे. हा अंदाज बळीराजासाठी जितका सुखावणारा आहे तितकाच तो उद्योग जगतासाठीही सुखावणारा आहे. कारण कोरोनामुळे उद्योग जगताची घसरलेली गाडी अजूनही सावरलेली नाही. त्यात मागील दोन वर्ष राज्यावर दुष्काळाचे सावट होते. मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळसदृश परिस्थिती होती त्याचा उद्योग जगतावर देखील मोठा परिणाम झाला आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून आहे. शेती हाच भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही देशाची ६० टक्के लोकसंख्या ही शेतीवरच अवलंबून आहे. त्यामुळे तिच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी शेतीचे विशेष महत्व आहे. मागील काही वर्ष देशात दुष्काळ पडला होता. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला होता. कोरोनामुळे देशातील अनेक उद्योग ठप्प पडले होते त्यामुळे देशाचा जिडीपी ही घसरला होता अशावेळी शेती क्षेत्राने देशाला वाचवले होते. कोरोना गेल्यानंतर सर्व काही सुरळीत होईल अशी अपेक्षा असतानाच मागील दोन वर्ष देशात आणि राज्यातील काही भागात भीषण दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती. या वर्षी राज्यात समाधानकारक पाऊस पडला असला तरी राज्यातील काही भागात दुष्काळसदृशच परिस्थिती होती. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. राज्यातील पाणी साठा संपत आला आहे. नद्या कोरड्या पडल्या आहेत. धरणे आटली आहे. बोअरवेलला पाणी लागत नाही. नागरिकांना वापरण्यासाठी सोडा पण पिण्यासाठी देखील पाणी मिळत नाही. एका एका हंड्यासाठी नागरिकांना कैक किलोमिटरची पायपीट करावी लागत आहे. शहरातही काही भागात टँकर चालू आहे. राज्यातील काही भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतीलाही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. अशावेळी सर्वांच्या नजरा हवामान खात्याच्या अंदाजाकडे लागल्या होत्या. सुदैवाने हवामान खात्याचा सुखद अंदाज आल्याने राज्यातील दुष्काळग्रस्त नागरिकांना सुखद धक्का बसला आहे. यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस होणार असल्याने भरघोस पीक येऊन रान आबादानी होणार आहे. शिवाय राज्यातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मिटणार आहे. जर हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार पाऊस झाला तर उद्योग जगतावर ही त्याचा सकारात्मक परिणाम होईल. एकूणच हवामान खात्याने वर्तवलेला मान्सूनचा हा सुखद अंदाज सर्वांनाच सुखावणारा आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# वेव्हज् : मनोरंजनाची सर्वसमावेशक चळवळ

मनोरंजन व्यवसायात योगदान देणाऱ्या विविध घटकांना एका मंचावर आणून त्यांना परस्पर सहकार्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीची संधी उपलब्ध करून देणाऱ्या वेव्हज शिखर परिषद आणि व्हेज बाजाराविषयी

भारत हा मनोरंजन आणि माध्यम उद्योग जगतातला एक आघाडीचा आणि तितकाच महत्त्वाचा देश. भारतात या उद्योग क्षेत्राची प्रगतीही तितक्याच झपाट्याने होत आहे आणि त्यासोबतच या परिसंस्थेच्या अवकाशात सातत्याने होत असलेल्या बदलांसह हे क्षेत्रही तितक्याच सातत्यपूर्णतेने बहरत चालले आहे. आज या क्षेत्राकडे नीट पाहिले तर विविध व्यासपीठांवरच्या आशय निर्मितीनेही मोठी उसळी घेतल्याचे दिसते. यामागचे कारण म्हणजे देशातील वाढत्या डिजिटल प्रसारण सेवा, प्रादेशिक भाषांमधील आशय सामग्री निर्मिती आणि सातत्याने नव्या, खिळवून ठेवणाऱ्या, सर्वसमावेशकतेची जाणीव करून देणाऱ्या आशयाची वाढती मागणी करत असलेला देशातला तंत्रज्ञानस्नेही प्रेक्षक वर्ग. त्यामुळेच तर आता भारतासाठी हे क्षेत्र केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून मर्यादित राहिलेले नसून, हे भारतासाठी सांस्कृतिक अभिव्यक्ती, आर्थिक विकास आणि जागतिक पटलावर आपला प्रभाव पाडण्याचे एक सामर्थ्यशाली माध्यम झाले आहे. लवकरच मुंबईत जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद (थीश्रव ींवळे तळींरश्र एपींशीींरळपाशपीं डीाळीं - थतएड) होणार आहे. येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान महाराष्ट्रात, मुंबई इथे ही शिखर परिषद होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे भारत सरकारनेच या परिषदेचे आयोजन केले आहे. ही परिषद जागतिक पटलावर भारताच्या वाढत्या महत्त्वाचे प्रतिबिंब असलेला एक मंच ठरणार आहे आणि वेव्हज बाजार हा या शिखर परिषदेअंतर्गतचाच एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. खरे तर गेल्या अनेक दशकांपासून मी या क्षेत्रातच जगतो, वावरतो आहे. या इतक्या प्रदीर्घ काळातील माझ्या स्वतःच्या अनुभवांवरून मी एक गोष्ट खात्रीने सांगू शकतो ती म्हणजे कथात्मक मांडणीत लोकांना एकत्र आणण्याची, त्यांना प्रेरित करण्याची आणि एकुणात परिवर्तन घडवून आणण्याची मोठी ताकद असते. याच पार्श्वभूमीवर वेव्हज आणि वेव्हज बाजाराच्या माध्यमातून भारताने जागतिक मनोरंजन क्षेत्रासाठी एका व्यापक सहकार्यपूर्ण भागीदारीचे आणि सर्वसमावेशक भविष्य घडवण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

खरे तर वेव्हज बाजार ही ऑनलाइन बाजारपेठेसाठी आखली गेलेली एक क्रांतिकारक संकल्पना आहे. ही ऑनलाइन बाजारपेठ म्हणजे जागतिक मनोरंजन परिसंस्थेअंतर्गतचे व्यावसायिक तज्ज्ञ, उद्योग - व्यवसाय, आणि कलाकारांना परस्परांसोबत जोडून देणारे माध्यम ठरणार आहे. या बाजारपेठेअंतर्गत या क्षेत्रातील परस्पर सहकार्य सुलभ करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले गेले आहे. याद्वारे या क्षेत्रातील व्यावसायिक तज्ज्ञांना नव्या संधी शोधण्याची आणि सहकार्यपूर्ण भागीदारी स्थापित करण्याची संधी मिळणार आहे. या बाजारपेठेला माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील एक अभिनव व्यवसाय केंद्र म्हणून स्थान मिळवून देण्याचाच सरकारचा प्रयत्न आहे. भारताचे माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी २७ जानेवारी २०२५ रोजी या अभिनव बाजारपेठेचे औपचारिक उद्घाटन केले होते. आर्थिक क्षेत्रात दावोस शिखर परिषदेचे स्थान आहे, तेच मनोरंजन क्षेत्रात वेव्हज शिखर परिषदेला मिळवून देण्याचा दृष्टिकोन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला होता. त्या दृष्टीने वेव्हज बाजार महत्त्वाचे साधन ठरणार आहे.

वेव्हज बाजाराच्या अधिकृत संकेतस्थळावर आतापर्यंत, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राशी संबंधित विविध क्षेत्रांमधील सुमारे ५५०० खरेदीदार, २००० पेक्षा जास्त विक्रेते आणि जवळपास १००० प्रकल्पांसाठी नोंदणी केली गेली आहे. भविष्यात या संकेतस्थळाला माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठीच्या आशय सामग्रीची एक सर्वसमावेशक बाजारपेठ आणि परस्पर संपर्काच्या केंद्राचे स्वरूप प्राप्त करून देणे हा सरकारचा मानस आहे. त्या दृष्टीनेच संकेतस्थळाला कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रोफाइलिंग म्हणजेच त्या त्या व्यक्तींची व्यावसायिक ओळख करून देण्याची तसेच मागणीनुसार जुळवणी करून देण्याच्या तंत्रज्ञानाचीही जोड दिली गेली आहे. या माध्यमातून ऑनलाइन संकल्पना मांडण्याचे सत्र, ऑनलाइन बीटूबी बैठका (विविध व्यावसायिक प्रतिनिधींच्या बैठका), वेबिनार या आणि अशाच प्रकारच्या इतर महत्त्वाच्या सत्रांचेही आयोजन केले जाणार आहे.

ही बाजारपेठ म्हणजे माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या अवकाशातील चित्रपट, दूरचित्रवाणी, ॲनिमेशन, गेमिंग, जाहिरात, वर्धित वास्तव (एक्स्टेंडेड रिॲलिटी), संगीत, ध्वनी संयोजन, नभोवाणी या आणि अशा विविध क्षेत्रांमधील भागधारकांना एकत्र आणणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. हे व्यासपीठ विक्रेते आणि खरेदीदारांतील दुवा ठरेल आणि त्याद्वारे व्यावसायिकांना आपली कौशल्ये सुलभतेने सादर करण्याची, त्यांच्या संभाव्य ग्राहकांसोबत थेट संपर्क साधण्याची आणि उपयुक्त सहकार्यपूर्ण भागीदारीची संधी उपलब्ध करून देत राहील.

एखादा चित्रपट दिग्दर्शक आपल्या चित्रपटासाठी निर्मिती भागीदाराच्या शोधात असेल, एखादा जाहिरातदार योग्य व्यासपीठाच्या शोधात असेल, एखादा गेम डेव्हलपर गुंतवणूकदाराच्या शोधात असेल किंवा एखादा कलाकार आपल्या कलाकृतींना जागतिक स्तरावरील प्रेक्षकांसमोर सादर करू इच्छित असेल, तर अशा सर्वांसाठी वेव्हज बाजारपेठेचा हा मंच म्हणजे परस्पर संपर्क, सहकार्य आणि व्यवसायवृद्धीचे बहुआयामी व्यासपीठ उपलब्ध करून देणारी मोठी जागा किंवा बाजारपेठ असणार आहे.

एका अर्थाने वेव्हज बाजार ही एकप्रकारची समन्वित बीटूबी बैठकांची अभिनव बाजारपेठ आहे, जिने जागतिक मनोरंज क्षेत्रातील परस्पर संपर्क व्यवस्था, परस्पर सहकार्यपूर्ण भागीदारी व्यवस्था, आणि विकासाचा संपूर्ण चेहरामोहरा अगदी क्रांतिकारकरीत्या बदलला आहे. या बाजारपेठेने चित्रपट, दूरचित्रवाणी, संगीत, गेमिंग, ॲनिमेशन, जाहिरात तसेच वर्धित वास्तव (एक्स), आभासी वास्तव (व्हीआर) यांसारख्या जिवंत अनुभूती देणाऱ्या तंत्रज्ञानाशी संबंधित तज्ज्ञ व्यावसायिकांना एकत्र आणणारा मंच उपलब्ध करून दिला आहे. आणि याद्वारे विविध सर्जनशील क्षेत्रांसाठीच्या आशय सामग्रीचे सूचीकरण, त्याचा शोध आणि संबंधित व्यवहारांसाठीचाही एक व्यापक मंच उपलब्ध झाला आहे. चित्रपट वितरणासाठीचा मंचाच्या शोधात असलेले निर्माते, नव्या संकल्पना मांडू पाहणारे गेम डेव्हलपर किंवा लायसन्सिंग संधींच्या शोधात असलेले साऊंड डिझायनर अशा सगळ्यांसाठी वर्गवारीनुसार सूचीकरण, सुरक्षितपणे सादरीकरणे पाहण्याची दालने आणि संपर्क व्यवस्था उपलब्ध करून देत ही संपूर्ण प्रक्रिया सुलभ करणारी बाजारपेठ म्हणून वेव्हज बाजार उदयाला येणार आहे.

या बाजारपेठेच्या माध्यमातून भौगोलिक मर्यादांच्या पलीकडे जात विक्रेते आणि खरेदीदारांना त्यांच्यासाठीचा योग्य भागीदार आणि संधी शोधण्याच्या दृष्टीने सक्षम करणाऱ्या सुविधांचा अंतर्भाव केला आहे. चित्रपट स्टुडिओ, ॲनिमेशन हाऊस, पॉडकास्ट निमिति, मार्केटिंग यंत्रणा यांसारख्या विक्रेत्यांना आपल्या सेवा आणि त्यांच्याकडची आशय सामग्री जागतिक गुंतवणूकदार, वितरक आणि भागीदारांसमोर सादर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. दुसरीकडे खरेदीदारांसाठीदेखील उच्च गुणवत्तेचे, आधुनिक काळाशी सुसंगत प्रकल्प या बाजारपेठेमुळे उपलब्ध होऊ लागले आहेत. त्याच वेळी गुंतवणूकदारांसाठीदेखील सहनिर्मितीच्या करारांची आणि व्यापक व्यावसायिक संधींची दारे खुली झाली आहेत. इथे आवर्जून उल्लेख करायला हवी अशी गोष्ट म्हणजे या व्यासपीठाला या उद्योग क्षेत्राशी संबंधित विशिष्ट उपक्रम, सादरीकरणे पाहण्याची दालने, गुंतवणूकदारांबरोबरच्या बैठका - चर्चा आणि कलाकृतींच्या थेट प्रक्षेपण सत्रांसारख्या लाइव्ह स्क्रीनिंगसारख्या उपक्रमांशी जोडले गेले आहे, यामुळे या व्यासपीठाच्या माध्यमातून केवळ आभासी संवादाच्या पलीकडे जात खऱ्या अर्थाने उपयुक्त असलेले करार आणि व्यवहार प्रत्यक्षात साकारले जातील याचीच सुनिश्चिती झाली आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान मुंबईत वांद्रे-कुर्ला संकुलात वेव्हज शिखर परिषद होणार असून त्यावेळी हा वेव्हज बाजारही साकारला जाणार आहे. यानिमित्ताने उपलब्ध करून दिलेल्या डिजिटल बाजारपेठेवर नोंदणी केलेल्या काही निवडक प्रतिनिधींना या बाजारपेठेत आपल्या संकल्पना मांडण्याची, या उद्योग क्षेत्रातील विविध घटकांसोबत संपर्क प्रस्थापित करण्याची, आघाडीच्या भागधारकांसोबत प्रत्यक्ष करार आणि व्यवहार पूर्णत्वाला नेण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. अभिनव दृष्टिकोनामुळे वेव्हज बाजार केवळ एक व्यासपीठ म्हणून मर्यादित राहिलेले नाही, तर ते अधिक स्मार्ट, परस्परांशी अधिक जोडलेले आणि जागतिक पातळीवरील सर्वसमावेशक मनोरंजन क्षेत्राच्या दिशेने सुरू झालेली चळवळच ठरले आहे.

एक कलाकार म्हणून, आम्ही कायमच आव्हानात्मक, प्रेरणादायी आणि चौकटीपलीकडे जाऊन विचार करायला लावणाऱ्या अवकाशाच्या शोधात असतो. वेव्हज हा अशाच प्रकारच्या अवकाशाच्या निर्मितीचा प्रयत्न आहे. दूरदृष्टीने सुरू केलेल्या या वाटचालीचा आपणही एक भाग असल्याचा मला खरोखरच अभिमान वाटतो. ही परिषद आपल्या परस्परांशी संपर्काच्या, कलाकृतींच्या निर्मितीच्या आणि मांडणीच्या पद्धतींमध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणेल. हा बदल केवळ भारतापुरता मर्यादित नसेल तर त्याचा प्रभाव अवघ्या जगात दिसेल. ही परिषद म्हणजे भारतासाठीचा 'लगान' क्षण आहे. जगभरातील माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी एकतेचा, धैर्याचा आणि एका अशा दृष्टिकोनाचा क्षण आहे, ज्याचा प्रतिध्वनी आपल्या सीमांच्याही पलीकडे ऐकू येत राहील.

**लेखक : आमिर खान, अभिनेता आणि निर्माते**

**(सौजन्यः पी आय बी, मुंबई)**

# ग. दि. कुलथे अनंतात विलीन



**मुंबई** - राज्यातील सर्व शासकीय राजपत्रित अधिकाऱ्यांची अधिकृत शिखर संघटना असलेल्या महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष, मुख्य मार्गदर्शक, सल्लागार श्री.गणपत दिनकर कुलथे, यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांच्या नवी मुंबईतील नेरुळ येथील राहत्या घरी काल दि.१४ एप्रिल रोजी रात्री ९.०० वाजता निधन झाले. आज त्यांच्या कुटुंबियांच्या तसेच शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संघटना पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नेरूळ येथील शांतीधाम येथे श्री.कुलथे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी कुलथे कुटुंबियांसमवेत विविध शासकीय विभागातील अधिकारी-कर्मचारी, विविध संलग्न संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी महासंघाचे माजी अध्यक्ष रवींद्र धोंगडे, विद्यमान अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ ,दुर्गा मंचच्या अध्यक्षा डॉ.सोनाली कदम, तृतीय श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष विश्वास काटकर, चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण, आदींनी यावेळी स्वर्गीय श्री.कुलथे यांच्याविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी उपस्थित सर्वांनी स्वर्गीय ग.दि.कुलथे यांचे संघटना चळवळीतील राहिलेले अपूर्ण कार्य त्याच तडफेने, प्रामाणिकपणाने पूर्ण करण्याचा संकल्प करून स्व. श्री.कुलथे यांना श्रद्धांजली वाहिली.



**विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना शहर शाखेवतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी जालनाचे आमदार अर्जुन खोतकर, शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना संपर्कप्रमुख पंडित भुतेकर. मेघराज चौधरी, मगरे, सुनील साळवे, किरण गरड, सुमीत वाघमारे, संदिप साबळे, योगेश रत्नपारखे, काशीनाथ मगरे, दशरथ तोडुळे, शुभम टेकाळे, सुनील रत्नपारखे, पांडूशेठ खैरे, आयुष्य राठोड आदींची उपस्थिती होती.**

# उषा नाडकर्णी, सुदेश भोसले यांचा गौरव



प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते आणि सांस्कृतिक व्यक्तिमत्व दत्तात्रेय बालकृष्ण माने यांच्या आयोजनात 'इंडियाज टॅलेंट सन्मान फोरम' (ITFS) पुरस्कारांचे भव्य आयोजन मुंबईच्या नरिमन पॉइंट येथील वाय. बी. चव्हाण सभागृहात पार पडले. या कार्यक्रमाला शिवसेनेचे नेते आणि महाराष्ट्र राज्याचे मंत्री उदय सामंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सोहळ्याला महेश मांजरेकर, सुदेश भोसले, अनुप जलोटा, इंडियन आयडॉलचे बालगायक मोहम्मद फैज, अयान खान, विंदू दारा सिंग, गायिका हर्षदीप कौर, दिव्यांका त्रिपाठी, उषा नाडकर्णी, निकेतन धीर, न्यूरोसर्जन डॉ. नितीन डांगे, स्ट्रोक स्पेशलिस्ट डॉ. प्रशांत रसाल, शहरी विकास विभागाचे संयुक्त आयुक्त श्री. पंकज देवरे, पश्चिम उपनगरचे अतिरिक्त जिल्हाधिकारी, स्टुडिओ रिफ्यूलचे निर्माता कुमार, एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष आणि एमडी आयएएस सूरज मंधारे, कृषी आयुक्त, तसेच रोहन कपूर आणि सिद्धांत कपूर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्काराने अनुप जलोटा, सुदेश भोसले यांच्यासह अनेक कलाकारांना सन्मानित करण्यात आले. अनुप जलोटा म्हणाले, महेंद्र कपूर यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे हे माझ्यासाठी अभिमानास्पद आहे. त्यांची गाणी भारतीयांच्या हृदयात रुजलेली आहेत आणि भक्तीभाव जागवतात. आयोजक दत्तात्रेय माने म्हणाले, या पुरस्कारांद्वारे चांगले कार्य करणाऱ्या अधिकारी, कलाकार आणि बालकलाकारांनाही गौरवण्यात आले. यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळेल. मंत्री उदय सामंत यांनी वेळ दिला, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. महेंद्र कपूर यांचे सुपुत्र रोहन कपूर म्हणाले, बाबांच्या नावाने पुरस्कार होणार म्हणून सुरुवातीला थोडा घाबरलो होतो, पण दत्तात्रेयजींनी अतिशय सुंदर आणि यशस्वी आयोजन केले. मी सर्व मान्यवरांचे आभार मानतो. महेंद्र कपूर यांचे नातू सिद्धांत कपूर यांनी कार्यक्रमात परफॉर्मन्स दिला. सुदेश भोसले यांनीही त्याच्या गायनाचे कौतुक करत म्हटले की, जसे महेंद्र कपूर यांनी त्याला आपली आवाज़ दिली आहे.

## पान १ वरुन

### गाळमुक्त धरण ...

मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर नाला खोलीकरण आणि रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाने जलसंधारण आणि शेतीच्या उत्पादकतेत वाढ करण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू केली आहे. यामुळे धरणांमधील गाळ काढून त्यांची साठवण क्षमता वाढवली जाईल आणि काढलेला गाळ शेतात पसरवून शेतीच्या सुपीकतेत सुधारणा होईल. घनसांवगी मतदारसंघात नाल्यांचे खोलीकरण आणि रुंदीकरण करून पाण्याचा प्रवाह सुधारणे आणि पूर नियंत्रणावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

आमदार हिकमत दादा उढाण यांनी सांगितले की ही योजना शेतकऱ्यांच्या हितासाठी अत्यंत महत्वाची आहे. नाला खोलीकरणामुळे पाण्याची उपलब्धता वाढेल आणि गाळयुक्त शिवारामुळे शेतीचे उत्पादन वाढेल. भारतीय जैन संघटनेच्या सहकार्याने या योजनेचा लाभ प्रत्येक गावापर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे.

भारतीय जैन संघटनेने या योजनेच्या प्रचारासाठी जलरथाच्या माध्यमातून जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. हा जलरथ मतदारसंघातील गावागावांत फिरून नागरिकांना योजनेचे फायदे आणि त्यात सहभागी होण्याचे आवाहन करणार आहे.

या कार्यक्रमाला स्थानिक प्रशासनाचे अधिकारी, भारतीय जैन संघटनेचे पदाधिकारी, उपस्थित होते. कर्यक्रमचे प्रस्तविक भारतीय जैन संघटनेचे जलप्रमुख नरेंद्र जोगड यांनी केले.

### भयमुक्त समाजनिर्मिती...

आणि विश्वास निर्माण होतो.

या कार्यक्रमास शिक्षकवर्ग, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून समाजप्रती जबाबदारीची जाणीव निर्माण केली.

### अल्पवयीन मुलीस ...

जालना येथील अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयातील निष्पन्न आरोपी याचे बाबत बारकाईने माहिती काढुन प्रकरणात तांत्रीक विश्लेषन केले असता, नमुद आरोपी हा पिडीत मुलीसोबत छ. संभाजीनगर येथे येत असल्याची गुप्त माहिती मिळाल्याने त्यांचा छ. संभाजीनगर येथे शोध घेत असतांना आरोपी व पिडीत सिडको बसस्थानक परीसरात मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव पोलीस ठाणे घनसावंगी येथे हजर केले आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, पोलीस उपअधिक्षक मनोज राठोड, पोलीस निरीक्षक पंकज जाधव (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनाखाली अँटी ह्यूमन ट्रॅफिकिंग युनिट कक्षाचे प्रभारी अधिकारी प्रियंका तुपे, पोउपनि रविंद्र जोशी, संजय गवळी, सागर बावीस्कर (स्थागुशा) महिला अंमलदार पुष्पा खरटमल, संगिता चव्हाण, आरती साबळे, रेणुका राठोड व चालक इकबाल शेख यांनी केलेली आहे.

### त्या उपविभागीय ...

आली नाही. तसेच तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांची जबाबदारी देखील नाकारता येत नाही यांच्या परवानगीशिवाय तलाठी ग्रामसेवक किंवा कृषी सहाय्यक एवढी मोठी भूमिका घेऊ शकत नाहीत असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

प्राथमिक स्वरूपात अंबड, घनसावंगी या दोन तालुक्यात ५० कोटी रुपये बोगस लाभार्थीच्या नावे जमा झाल्याचे समोर आले आहे. सध्या गोपनीय चौकशी सुरू आहे. ती पूर्ण झाल्यानंतरच किती तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायक सहभागी आहेत ते पुढे येईल. परंतु संबंधित दोन्ही उपविभागीय अधिकारी व चारही तहसीलदार या ठिकाणी कार्यरत राहिले तर निपक्षपाती चौकशी होऊ शकणार नाही कदाचित या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये संबंधित अधिकारी जबाबदार असतील तर ते सर्व पुरावे मिटवण्यासाठी व हा भ्रष्टाचार येऊ नये यासाठी प्रयत्न करतील त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात येऊन अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी केली.

# श्री गुरुदेव विद्या मंदिर वडीगोद्रीच्या विद्यार्थ्यांना मिळणार शुद्ध पाणी

**अंबड । प्रतिनिधी -** तालुक्यातील वडीगोद्री येथील श्री गुरुदेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी शुद्ध पाण्याचे वॉटर फिल्टर चे उद्घाटन दिनांक ९ एप्रिल रोजी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विद्या समितीचे अध्यक्ष श्री समाधान जी मडके सर तसेच वडीगोद्रीचे सरपंच पंढरीनाथ नाना खटके व प्राचार्य आर.के. माळी सर यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर दांडगे मॅडम, मुंडे सर, जी. आर .गावडे सर, प्रा. खांडेभराड सर उपस्थित होते. उद्घाटन झाल्यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वडीगोद्रीचे सरपंच खटके नाना त्यांनी सांगितले की विद्यार्थ्यांसाठी अतिशय महत्त्वाचे कार्य या ठिकाणी शाळेच्या वतीने करण्यात आलेली आहे. त्याबद्दल मी मडके सर व म ाळी सर यांचे प्रथम धन्यवाद व्यक्त करतो. कारण आपल्या शाळेत जवळपास ११00 विद्यार्थी शिक्षण घेतात या विद्यार्थ्यांना पाणी शाळेमध्ये उपलब्ध होते परंतु आता आजकाल सर्व ठिकाणी घरी असो, म ार्केटमध्ये असो, किंवा हॉटेलमध्ये विविध रोगापासून संरक्षण होण्यासाठी आपण सर्वजण शुद्ध पाणी विकत घेऊन पितो. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी पिण्यास मिळाल्यामुळे विद्यार्थी आजारी पडणार नाही. तसेच या शाळेच्या विविध कार्यक्रम ासाठी मी नेहमीच उपस्थित असतो मला ग्रामपंचायत मार्फत जे काही शाळेच्या विकासासाठी करता येईल त्या योजना मी राबवण्याचे काम करीत असते. विद्यार्थ्यांनी पाणी वाया न घालता व्यवस्थित वापरले पाहिजे. कारण भविष्यामध्ये पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता वाटते. तसेच प्राचार्य आर.के माळी सर यांनी सांगितले की वॉटर फिल्टर चे पाणी आपण सर्वांनी जपून वापरले पाहिजे. जल है तो कल है त्याचबरोबर आम्ही गावकऱ्यांच्या विद्यार्थ्यांसाठी ज्या मागण्या आहेत त्या आम्ही पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असतो. शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी शाळेतच उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थी आजारी पडणार नाही. विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवण्याचे काम आम्ही सर्व शिक्षक करत असतो. त्याम ध्ये गावकऱ्यांचे सहकार्य लाभत असते. तसेच वॉटर फिल्टर ची काळजी घेणे हे सर्व शिक्षकांचे काम आहे. अजूनही काही शाळेसाठी विकासाचे कार्य करायचे आहे त्यामध्ये संस्थेने आम्हाला सहकार्य करावे असेही त्यांनी सांगितले... बाहेरगावीच्या विद्यार्थ्यांचा बसचा प्रश्न असो किंवा महाराष्ट्र शासनातर्फे घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धात्मक परीक्षा मध्ये गुरुदेव शाळेचे विद्यार्थी नेहमीच भाग घेत असतात... या कार्यक्रमासाठी विद्यार्थी खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साळी सर यांनी केले व आभार प्रदर्शन श्री खिलारे सर यांनी केले त्याचबरोबर साळुंखे सर, पाटील सर, वाघमारे सर, सुरासे सर, येरावाड सर, बोरकर सर, सुळसुळे सर, प्रा. गणेश खटके सर, पिंपरे मॅडम,काळे सर, लिंगायत, आप्पा चव्हाण उपस्थित होते.



# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील साठे नगर प्रभागात - बहुसंख्येने मातंग समाज बांधव राहतात अण्णाभाऊ साठे नगरात बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम दि.१४ एप्रिल २०२५ रोजी आयोजित करण्यात आला. भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन माजी नगरसेवक बाबुराव हिवाळे यांच्या हस्ते करण्यात आले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला माजी नगरसेवक रामचंद्र पानवले यांनी पुष्पहार अर्पण केला. भारतीय बौद्ध म हासभेचे केंद्रय शिक्षक अंकुश लांडगे यांनी उपस्थिताना त्रिशरण पंचशीला सह भीम स्तुती घेऊन कार्यक्रमाला सुरुवात केली. बाबासाहेबांनी हिंदू धर्माचा त्याग करून स्वातंत्र्य समता आणि बंधुत्व या त्रिसूत्री वर आधारित प्रज्ञाशील करुणा आणि मैत्री या उच्चतम मूल्यांची देणगी देणारा भगवान बुद्धाचा धम्म का स्वीकारला याबद्दल सविस्तर विवेंचन रामचंद्र पानवाले यांनी केले.

प्रत्येक वर्षी मातंग सम ाजाच्या वतीने अण्णाभाऊ साठे चौकामध्ये मातंग बांधवांच्या वतीने मिरवणुकीतील बाबासाहेबांच्या प्रतिमेच्या सुशोभित रथाचे मोठ्या हर्षल्हासाने स्वागत करण्यात येते. फटाक्यांची अतिशय बाजी आणि फुलांचा वर्षाव करून जल्लोष करण्यात येतो. मिरवणुकीतील लोकांसाठी थंड पेयाची व्यवस्था करण्यात येते. अलीकडच्या काळात मातंग समाजातील शिकलेल्या तरुणांमध्ये आत्मभान आले आहे. त्यांना बाबासाहेबांच्या विचारांशिवाय तरुणोपाय नाही याची जाणीव झाली आहे. म ाजी नगरसेवक बाबुराव हिवाळे आणि साठे नगर फ्रेंड्स क्लब व भारतीय बौद्ध महासभेच्या समन्वयाने मातंग समाजातील बांधव बाबासाहेबांच्या प्रती आपली कृतज्ञता प्रकट करण्यासाठी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले. प्रकाश शेवाळे. गोविंद हिवाळे. सर्जेराव प्रधान. दत्ता शोरूम .सचिन हिवाळे. अशोक पुरोळे. सुरेश गायकवाड. अशोक हिवाळे.अरुण सदावर्ते. मदन धंदेरवळ .गणेश लाल झरे.पांजगे साठे. लोंढे कांबळे. कासारे यांच्यासह समता सैनिक दामोदर जी मगरे व महादेव लाटे यांची उपस्थिती होती.




# जागृत दक्षिणमुखी घनतृप हनुमान मंदिर बारागाड्याचा कार्यक्रम उत्साहात; मारोती विठ्ठल सुरसे यांचा सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** येथील आराध्य दैवत रामनगरातील जागृत घनतृप दक्षिणमुखी हनुमान मंदिरात ११२ वर्षाची परंपरा कायम राखत यावर्षीही १२ एप्रिल रोजी बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला.

सायंकाळी ५ ते रात्री ९.३० वाजेपर्यंत हा धार्मीक कार्यक्रम सुरू होता. यावेळी अनेकांनी आपले नवस पुर्ण केले. या उत्सवासाठी अध्यक्ष उत्सव समितीचे अध्यक्ष बाबासाहेब वानखेडे यांच्यासह रामेश्वर सुरसे, भगवान गाडेकर, हरिभाऊ वानखेडे, सिताराम रोडगे, रामदास गोरे, कृष्णा वानखेडे, बाबासाहेब सोनवणे, निलेश वानखेडे,नितीन तायडे, भगवान येवले, गणेश सोमधाने, बाबुराव मामा सतकर, शिवलाल घाडगे आदिंसह भाविक भक्तांची उपस्थिती होती. जालना शहर वाहतूक शाखा व सदर बाजार पोलिसांनी मोठा बंदोबस्त होता. यावेळी हजारो भाविकांनी घनतृप दक्षिणमुखी श्री हनुमानाचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी बारा गाड्यासाठी ११ हजाराची देणगी देणाऱ्या मारोती विठ्ठल सुरसे यांचा समितीच्या वतीने प्रमाणपत्र व नारळ व स्मृतीचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

जिल्हा स्तरीय कार्यशाळा संपन्न

# गावा गावात थांबणार हंगामी स्थलांतरीत बालक

**घनसावंगी । प्रतिनिधी** - जिल्हा परीषद जालना पंचायत समिती घनसावंगी पंचायत समिती परतुर मराठवाडा ग्रामिण विकास संस्था छत्रपती संभाजीनगर याच्या संयुक्त विद्यामाने जिल्हा स्तरीय कार्यशाळा संपन्न झाली या कार्यशाळेचे उद्घाटन मा श्री रविद्र जोशी गटशिक्षणधिकारी जालना विस्तार अधिकारी के बी सोळके विस्तार अधिकारी पी पी खिल्लारे जिल्हा लाईन समन्वयक भाउसाहेब गुजाळ जिल्हा समन्वयक एकनाथ राउत सोमेश्वर सोनटक्के याची उपस्थित होते

या कार्यशाळेत घनसावंगी परतुर मधुन जे उसतोड मंजुर कामसाठी बाहेर गावी जात आहे उसतोडी जिनिग काम इतर हंगामी सथलंतर होताना दिसत आहे त्याच्या सोबत त्याचे मुले ही जात असतात या मुला साठी गाव पातळीवर हंगामी आनिवाशी वस्तीगृह स्थापन करणे किवा पर्यायी व्यवस्था करणे मुले मागे राहिली की शिक्षण आरोग्य पोषण या बाबत प्रश्न निर्माण होतो तसेच इतर योजना पासुन वंचीत राहतात त्याम ुळे गाव पातळीवर हंगामी स्थलांतरीत कुटुबाची गृहभेट देउन येणाऱ्या हंगामात कोण कोण जात आहे त्याची महिती ठेवणे गाव पातळीवर स्थलंतर नोद वही नाव नोदणे गावातुन जात असताना नोदणी प्रमाणपत्र आहे किवा नाही पडताळणी करावे त्याचे मुलं मागे कसे राहातील या साठी प्रयत्न करणे मागे रहिल्या म ुलासाठी अनिवाशी वस्तीगृह बाबत पाठपुरावा करणे आदि कामे गावातील ग्राम पंचायत शालेय व्यवस्थापन समिती गाव बाल संरक्षण समिती मुख्याध्यापक गाव स्वयंसेवक यानी करावे या कार्यशाळेला परतुर घनसावंगी तालुक्यातील मुख्याध्यापक शालेय व्यवस्थापन समिती गाव बाल संरक्षण समिती याचे अध्यक्ष सदस्य गाव स्वयंसेवक राजेश वाघमारे सुरेखा वाघमारे अजय गाढे योगेश आढे महादेव खरात आकाश चैगुले याची उपस्थित होती.

झाडे लावा

झाडे जगवा

# तमाशा व कलाकेंद्र कलावंतांच्या तक्रारी निवारणासाठी समिती गठीत

**मुंबई । प्रतिनिधी -** राज्यातील तमाशा आणि कलाकेंद्र कलावंतांच्या विविध तक्रारींचे निवारण करण्यासाठी दोन स्वतंत्र समित्यांच्या गठनाचा निर्णय सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी घेतला आहे.

या समित्या तमाशा आणि कलाकेंद्र क्षेत्रातील फड मालक, कलाकार, वादक यांच्यासमोरील समस्या समजून घेऊन, पारंपरिक लोककला टिकवून ठेवण्यासाठी उपाययोजना सुचवतील, अशी माहिती मंत्री ड.शेलार यांनी दिली.


तमाशा तक्रार निवारण समितीमध्ये सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक हे अध्यक्ष असणार असून, तमाशा फड म ालक रघुवीर खेडकर, तमाशा फड मालक गोपाळ नाना शेषेराव, फड मालक संभाजी जाधव, कलाकार मंगलाताई बनसोडे, कलाकार अतांबर तात्या शिरढोणकर, अभ्यासक गणेश चंदनशिवे, अभ्यासक खंडुराज गायकवाड व सहसंचालक सदस्य म्हणून काम पाहतील.

कलाकेंद्र तक्रार निवारण समि तीमध्ये संचालक सांस्कृतिक कार्य हे अध्यक्ष असणार असून, कलाकेंद्र मालक बाळासाहेब काळे, कलाकेंद्र मालक अभिजित काळे, कलाकार रेश्मा परितेकर, कलाकार सुरेखा पुणेकर, कलाकार प्रमिला लोदगेकर, कलाकार संघटनेचे धोंडीराम जावळे, अभ्यासक प्रकाश खांडगे व सहसंचालक हे सदस्य म्हणून काम पाहतील.

या समित्यांचा कार्यकाळ ३० दिवसांचा असून, आवश्यकतेनुसार या क्षेत्रातील इतर अभ्यासक, कलाकार आणि कलाकेंद्र चालक यांनाही पाचारण करण्यात येणार आहे. या समित्यांमार्फत प्राप्त होणाऱ्या शिफारसीनुसार शासनाकडून निर्णय घेतला जाणार आहे.

# धारावीत कक्कया समाजातील वधू-वरांसाठी मोफत सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन!

**मुंबई । प्रतिनिधी -** कक्कया समाज सार्वजनिक गणेशोत्सव, धारावी च्या वतीने दि. १० मे २०२५ रोजी कक्कया सम ाजातील वधू-वरांसाठी मोफत सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन श्री गणेश विद्या मंदिर हायस्कुल, संत कक्कया मार्ग, धारावी, मुंबई - ४०००१७ येथे करण्यात आले आहे.या सामुहिक विवाह सोहळ्यासाठी नांव नोंदणी सुरु करण्यात आली आहे.हा विवाह सोहळा मोफत असून यावेळी




सामुहिक विवाह सोहळ्यात विवाह होणाऱ्या वधू-वरांस संस्थेमार्फत १) वधू-वरांस पोशाख २) संसार उपयोगी सामुग्री ३) सोन्याचे मनीमंगळसूत्र ४) संस्थेचे विवाह प्रमाणपत्र ५) सामुहिक विवाह सोहळ्यात विवाह होणाऱ्या मुंबई बाहेरुन येणाऱ्या वधु व वरांची तसेच नातेवाईकांची राहण्याची व जेवणाची सोय करण्यात आलेली आहे. ६) ग्रामीण भागातील गरीब व गरजू वधू-वरांस मुंबईला येण्याकरिता प्रवास खर्च देण्यात येणार आहे.


समाजातील इच्छुक वधू व वर आणि त्यांचे पालक यांनी विवाह इच्छुक वधू-वरांची जोडीदार निवड झालेली असल्यास त्यांना आवाहन करण्यात येत आहे की,आपण आपल्या मुला-मुलींचे विवाह आमच्या संस्थेच्या वतीने होऊ घातलेल्या सामूहिक विवाह सोहळ्यात नाव नोंदणी करावी व त्या सामुहिक विवाह सोहळा कार्यक्रम ाची शोभा वाढवावी. तसेच आपल्या नात्यातील, परिचयातील महितीतील गावखेडा, तालुका, जिल्हा पातळीवर सर्वापर्यंत या सामूहिक विवाह सोहळ्याची माहिती पोहचवावी व जास्तीत जास्त जोडप्यांचा विवाह या सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होण्याकरीता माहिति प्रसारित करुन विवाह ठरलेल्या लोकांची नोंद करण्यास मदत करावी.असे कार्यक्रम ाचे आयोजक तथा निमंत्रक

हेमंत व्हटकर (अध्यक्ष) म ो.९९८७९८६१६१, परशुराम खंदारे (उपाध्यक्ष) मार्गदर्शक : विजय धर्मा पोळ-८६५२३६९२५९, मसाजी श्रीपती होटकर( सचिव), मो. ९०८२६६९९५५, किरण व्हटकर (उपाध्यक्ष) , मंगेश खरटमोल(खजिनदार)मो. ८१६९९६१४९८,मनोहर तायप्पा सोनवणे (कार्याध्यक्ष)-९८६७७०८३६१, बाबुराव कावळे (उपसचिव) किशोरकुमार(सुनिल) धों. पोळ मो. ९८६७१७०८८०,रविंद्र म हादेव कदम (उपखजिनदार ), किशोर खाटीकमारे मो.९३२१२१२७८६, विजय शिंदे -७०२१२२५९७८ यांनी कळविले आहे.

# ज्येष्ठ पत्रकार गंगाधर अंबेकर यांचे निधन

**जालना । प्रतिनिधी -** पारध ( ता. भोकरदन, जि. जालना ) येथील रहिवासी असलेले ज्येष्ठ पत्रकार गंगाधर लक्षमण अंबेकर यांचे सोमवार, १४ एप्रिल रोजी पहाटे साडेतीन वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी ते ७७ वर्षांचे होते.

गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती अस्वस्थ होती. त्यांच्यावर जालना येथील रूग्णालयात उपचार सुरू होते. सोमवारी पहाटे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. जालना येथील रामतीर्थ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी प्रा. सुखदेव मांटे, जेईएस म हाविद्यालयाचे प्राचार्य गणेश अग्निहोत्री, डॉ. यशवंत सोनुने, ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशम ुख, भगवान पालकर, प्रा. म हावीर सदावर्ते, पत्रकार विनोद काळे, कैलास दांडगे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



गंगाधर अंबेकर यांनी तब्बल चाळीस ते पंचेचाळीस वर्षे अजिंठा, मराठवाडा, लोकमत, देशोन्नती, दुनियादारी यासारख्या विविध वृत्तपत्रात पत्रकारिता केली. ग्रामीण भागातील प्रश्न त्यांनी सातत्याने वृत्तपत्रातून प्रभावीपणे मांडले. याशिवाय ते उत्तम कवि, शाहीर, लोककलावंत, नाट्यकर्मी देखील होते. भजनातील गण, गवळण, भारूड, लावणी, पोवाडा आदी साहित्य लेखन त्यांनी केलेले आहे. त्यांची काही पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. 'लावणीचे लावण्य', 'हिराजी बाबांचा पोवाडा' आदी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.